| MHBI150015692022 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४३२/२०२२ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश (मंगल बाळकृष्ण आवढाळ वगैरे विरुध्द कोणीही नाही)** |
|---|---|

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्जदारांचे थोडक्यात असे कथन आहे की, बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ हे दिनांक ०३.०९.२०२२ रोजी आजारपणामुळे ब्राम्हणगल्ली, पाटोदा, ता.पाटोदा, जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हे मयताची मुले आहेत. मयताचे आई-वडिल पुर्वीच मयत झालेले असून मयतास मुलगी नाही. मयतास अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ यांचा मृत्यू झाल्यानंतर अर्जदार यांनी त्यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी संबंधित कार्यालयात गेले असता संबंधीत अधिका-यांनी त्यांना सक्षम कोर्टाकडून वारस प्रमाणपत्र हजर करणेस सांगितले. म्हणून अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** अर्जदार क्र.३ किरण पि. बाळकृष्ण आवढाळ यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१० वर सादर केले आहे. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे सर्व कथने शपथपत्रात केलेली आहेत. तसेच अर्जदारांनी कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी क्र.६ वर बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ यांचा मृत्यू दाखला, निशाणी ४ सोबत अनुक्रमांक २ ते ५ वर मयत व अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधारकार्डच्या पडताळलेल्या प्रती, अनुक्रमांक ६ वर मयताचे रेशनकार्डची पडताळलेली प्रत, तसेच निशाणी ९ वर "दैनिक चंपावतीपत्र" या वृत्तपत्रातील जाहीरनामा दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या तर्फे पुरावा बंद

पुरसिस निशाणी क्र.११ वर दाखल केलेली आहे.

**४.** अर्जदार यांच्या तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.महाजन यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञ यांनी अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केला.

**५.** अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ हे अर्जदार क्र.१ यांचे पती तर अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील होते. अर्जदार यांनी निशाणी क्र.६ वर दाखल केलेल्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ हे दिनांक ०३.०९.२०२२ रोजी पाटोदा, ता.पाटोदा, जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यांचे अर्जास जाहीर नोटीस प्रसिध्द करुनही अर्जात हजर होवून कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात कथन केलेली सर्व कथने अबाधीत राहीलेली आहेत.

**६.** अर्जाचे वरील विवेचनावरुन व अर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार, अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत असल्याने, अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेस कोणतीही अडचण दिसून येत नाही. परिणामतः अर्जदार क्र.१ ते ३ हे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता पात्र असल्याचे दिसून येते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## — आदेश —

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२. अर्जदार क्र.१** मंगल भ्र. बाळकृष्ण आवढाळ, **अर्जदार क्र.२** गिरीष पि.

बाळकृष्ण आवढाळ आणि **अर्जदार क्र.३** किरण पि. बाळकृष्ण आवढाळ हे मयत बाळकृष्ण पि. नारायणराव आवढाळ यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ मधील तरतुदीनुसार कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

**३.** सदरचे वारसा प्रमाणपत्र हे अर्जात नमुद कारणासाठी म्हणजेच वारस असलेबाबत लागू राहील इतर कोणत्याही कारणाकरीता लागू राहणार नाही.

**४.** **अर्जदार क्र.१** मंगल भ्र. बाळकृष्ण आवढाळ, **अर्जदार क्र.२** गिरीष पि. बाळकृष्ण आवढाळ आणि **अर्जदार क्र.३** किरण पि. बाळकृष्ण आवढाळ यांना त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे व सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ मधील परिच्छेद क्र. ३१२ प्रमाणे मुळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमुद करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ARTEE ASHOK PATIL
Date: 2023.02.08 17:15:53 +0530

ठिकाण– पाटोदा (श्रीमती ए.ए.पाटील )

दिनांक – ०८/०२/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटोदा

**:: C E R T I F I C A T E ::**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
(R.M.Naik)
Steno Grade-III

(a) Dictated on : 08/02/2023
(b) Transcribed on : 08/02/2023
(c) Checked & signed on : 08/02/2023